।। सा विद्या या विमुक्तये ।।

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर,विष्णुपूरी,नांदेड —४३१६०६(महाराष्ट्र)SWAMI RAMANAND TEERTH
MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 (Maharashtra)
Established on 17th September 1994,Recognized by UGC U/s 2(f)and 12(B),NAAC Re accredited with 'B++'Grade

## DEPARTMENT OF EXAMINATION (ELIGIBILITY SECTION)

Phone:(02462)229242,43,44 E-mail: eligibility@srtmun.ac.in

परीक्षा/पात्रता/२०२३—२४/150 दि. ०३/०५/२०२३

**अत्यंत तातडीचे**

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालय,
उपकेंद्र लातूर,उपपरिसर परभणी,सर्व संकूले,
प्रस्तुत विद्यापीठ

विषय :— जाती दाव्याची तपासणी करणे बाबत...
संदर्भ:— विकाऔ/शिक्षण/२०२३/८९० दि.२२/२/२०२३

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) यांचे संदर्भीय पत्रानूसार सोबत जोडलेल्या तक्त्यात मागणी केल्याप्रमाणे शै.व.२०१२—१३ ते २०१६—१७ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांची सर्व माहिती भरून लवकरात लवकर सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद (छ.संभाजीनगर) कार्यालयास पाठवण्याची कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल प्रस्तुत विद्यापीठास सादर करावा.ही विनंती.

सोबत:— सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांचे पत्र

उपकुलसचिव
परीक्षा विभाग

महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
इमेल: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

पदव्युत्तर विभाग
स्वा.रा.ती.म. विद्यापीठ,
आवक क्र. 2447 दिनांक 21-4-23

जा.क्र. : विकाऔ/शिक्षण/२०२३/ 890 दिनांक : 22 FEB 2023

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ,नांदेड
कुलसचिव कार्यालय
19 APR 2023
आवक क्र. 479

प्रति,
प्राचार्य,
शासकीय/अशासकीय अनुदानित/कायम विनाअनुदानित,
पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी अभियांत्रिकी/वास्तुशास्त्र/
औषधनिर्माणशास्त्र/एम.बी.ए./एम.सी.ए./एच.एम.सी.टी.
अभ्यासक्रमांच्या संस्था (औरंगाबाद विभाग)

**विषयः-** **जाती दाव्याची तपासणी करणे बाबत...**

संदर्भः-
१. मा. संचालक तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. २अ/एडीएम/वैधतातपासणी/२०२२/३४, दि. ०९/०२/२०२३.
२. मा. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे पत्र क्र. आसंप्रसं-२०२२/प्र.क्र.६६/ का.३(समन्वय)/४४६२, दि. २६/१२/२०२२.

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी श्री सदानंद नुऱ्या गावीत, जि. नंदुरबार यांनी दि. २३.११.२०२२ रोजी अप्पर सचिव आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना दिलेल्या निवेदनात शै. व. २०१२-१३ ते २०१६-१७ या कालावधीतील विद्यार्थ्यांनी बनावट जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सादर केल्याच्या शंकेमुळे खऱ्या अनुसूचित जमातीच्या अर्जदारांना वंचित केले आल्याचे नमूद केले आहे.

सदर शंकेचे निरसन करण्याच्या अनुषंगाने आपल्या संस्थेतील शैक्षणिक वर्ष २०१२-१३ ते २०१६-१७ पर्यंतच्या अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर प्रवेश घेतलेले आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांचे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र यांच्या झेरॉक्स (प्राचार्यांच्या साक्षांकित) प्रती तात्काळ या कार्यालयास उपलब्ध करुन देण्यात यावे. जेणे करून सदर जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र यांच्या आधारे संबधित अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्याकडून वैधता प्रमाणपत्र दिल्याची सत्यता पडताळणी करणे सोईचे होईल व त्याद्वारे निवेदनकर्ता यांच्या शंकेचे निरसन होईल.

तरी शैक्षणिक वर्ष २०१२-१३ ते २०१६-१७ पर्यंतच्या अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर प्रवेश घेतलेल्या आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांची माहीती google form (अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र अपलोड करणे) (https://forms.gle/PCAUMwAMfPuGyT5V8) या लिंकवर भरुन सात दिवसांच्या आत या कार्यालयास विनाविलंब सादर करावी तसेच या कार्यालयास विद्यार्थ्यांच्या यादीसह जात व जात वैधता प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती या कार्यालयास सादर करण्यात याव्यात.

| अ. क्र. | संस्था डीटीई क्रमांक | संस्थेचे नांव | शैक्षणिक वर्ष | अभ्यासक्रमाचे नांव | विद्यार्थ्यांचे नाव | विद्यार्थ्यांचे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र (अपलोड करावे) | विद्यार्थ्यांचे अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र (अपलोड करावे) | विद्यार्थ्यांचे अनुसूचित जात/ जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास त्याची कारणे (आवश्यकता असल्यास खास दुतामार्फत हस्तदेय पध्दतीने सात दिवसाच्या आत सादर करावी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

विद्यार्थ्यांचे अनुसूचित जात/ जमातीचे जात वैधता प्रमाणपत्रांबाबतची माहिती आपण व्यक्तिशः लक्ष देऊन सात दिवसाच्या आत सादर होईल याची दक्षता घ्यावी तसेच याची संपुर्ण जबाबदारी संस्थेच्या प्राचार्यांची राहील याची आपण व्यक्तिशः नोंद घ्यावी.

**(उमेश नागदेवे)**
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद